## जाहितीचे प्रारुप

### जाहिरात क्र. १/२०२०

### जिल्हापाणीवस्वच्छतामिशनकक्ष स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) जिल्हा परिषद, नंदुरबार

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत जाहिरात क्र.०१/२०१८ अन्वये मुल्यमापन व MIS सल्लागार या पदासाठी जाहिरात प्रसिद्ध करुन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागणी करण्यात आले होते. विहीत मुदतीत प्राप्त अर्जांची छाननी अंती पात्र व अपात्र उमेदवारांची यादी प्रसिद्धी केली असता अपात्र उमेदवारांने वयोमर्यादेबाबत लेखी हरकत / आक्षेप नोंदविल्याने त्याबाबत शासन स्तरावरुन मार्गदर्शन मागणी करण्यात येऊन मार्गदर्शन प्राप्त होईपावेतो निवड प्रक्रिया स्थगीत ठेवण्यात आली होती. परंतू याबाबत शासन स्तरावरुन मार्गदर्शन प्राप्त न झाल्याने सदर भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येऊन सदर पदभरतीसाठी नव्याने जाहिरात www.nandurbar.gov.in व www.zpndbr.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदरचे पद तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने जिल्हास्तरावर एकत्रित मानधनावर असुन भविष्यात सदर पदावर शासन सेवेमध्ये कायम करण्याचा हक्क सांगता येणार नाही. या अटीं वरच पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचे आहेत.

| अ.क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता | मानधन |
|---|---|---|---|
| १. | मुल्यमापन व MIS सल्लागार (Monitoring, Evaluation cum MIS Consultant) **(खुला प्रवर्ग)** | **किमान अर्हता-** कोणत्याही विषयातील पदवी किमान ५० % गुणांसह व संगणकाचे ज्ञान-MS-Office.<br>**प्राधान्य-** गणित / संख्याशास्त्रामधील पदवी Advance Diploma Course in Computer (Data Bank Management) किंवा तत्सम.<br>**अनुभव-**स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागातील MIS व सनियंत्रणा बाबत जिल्हास्तरावरील २ वर्षचा अनुभव ऑनलाईन संगणक प्रणालीबाबत अनुभव.<br>**प्राधान्य-** जलस्वराज्य अथवा तत्सम सहभात्मक विकासाच्या कार्यक्रमामधील जिल्हास्तरावरील अनुभव असल्यास प्राधान्य. | **आर्थिक मोबदला-** दरमहा एकत्रित मानधन रु.१३०००/- व रु.५०००/- प्रोत्साहन मानधन. |
| २. | कंत्राटी लेखाधिकारी | **किमान अर्हता -** वाणिज्य शाखेतील पदवी किमान ५५% गुणासह MS-CIT<br>**अनुभव-** स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागामध्ये २ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | दरमहा एकत्रित मानधन रुपये १२०००/- |

**अर्ज सादर करण्याची पद्धत-**

पात्र उमेदवारांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ते दिनांक 02 /0३/२०२० रोजी संध्या. ०५.०० वा. पर्यंत विहीत नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरुन स्वस्वाक्षाकंनांसह आवश्यक कागदपत्र अर्जासोबत जोडून समक्ष अथवा पोस्टोने **जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष टोकरतलाव रोड, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, जिल्हा परिषद, नंदुरबार** या कार्यालयास सादर करावेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त अर्ज कुठल्याही परिस्थितीत स्विकारण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**निवडीची पद्धत-**

महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागा कडिल शासन शुध्दीपत्रक क्रं.ग्रापाधो१११०/प्र.क्र२४६ (अ) पापु-०७ दि. १७ सप्टेंबर २०११ अन्वये उक्त नमुद प्रती पदांकरीता सहा व त्यापेक्षा जास्त पात्र उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले असतील अशा वेळी महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागा कडिल शासन शुध्दीपत्रक १५/७/२०११ मध्ये नमुद केले नुसार ५० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याकरीता उमेदवारांनी किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. लेखी परिक्षेतील गुण तसेच उमेदवारांचे उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभव या करीता आवश्यक ते गुण देवुन शासन निर्णयातील जोडपत्र अ नुसार गुणवत्तेच्या आधारे निवडसुची तयार करुन उमेदवारांची निवड केली जाईल . सदर रिक्त पदांसाठी ५ व त्यापेक्षा कमी पात्र अर्ज प्राप्त झाल्यास लेखी परिक्षा न घेता ५० गुण संबंधित पदांकरीता विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये प्राप्त गुण, अनुभव व उच्च शैक्षणिक अर्हता अनुभव या आधारे गुणवत्ता यादी तयार करणेत येऊन

भरती प्रक्रियेचे अंदाजित वेळापत्रक

| अ.क्र. | बाब | दिनांक |
|---|---|---|
| १. | वृत्तपत्रा त जाहिरात प्रसिध्द करणे | २६/०२/२०२० |
| २. | अर्ज करण्याची प्रथम व अंतिम तारीख ( सुटीचे दिवस वगळुन) | २७/०२/२०२० ते ०२/०३/२०२० |
| ३. | पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | ०५/०३/२०२० |
| ४. | अपात्र उमेदवारांच्या यादीवर आक्षेप घेण्याची शेवटची तारीख | ०६/०३/२०२० |
| ५. | आक्षेपावर निर्णय घेणे | ०९/०३/२०२० |
| ६. | लेखी परिक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | ११/०३/२०२० |
| ७. | लेखी परिक्षा | १५/०३/२०२० |
| ८. | लेखी परिक्षेचा निकाल प्रसिध्द करणे | १८/०३/२०२० |
| ९. | मौखिक परीक्षा | १९/०३/२०२० |
| १० | अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे | २०/०३/२०२० |
| ११. | निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती पत्र देणे | २३/०३/२०२० |

**वयोमर्यादा :-**जाहिरात प्रसिध्द तारखेस उमेदवाराचे वय १८ पेक्षा कमी व ४० पेक्षा जास्त नसावे. माजी सैनिकांसाठी उच्चत्तम वयोमर्यादा ४५ वर्ष

**सर्वसाधारण सुचना.**

१.अर्ज स्विकारण्याचा विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज, अपुर्ण माहिती भरलेले व ईमेलद्वारे पाठविलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

२. अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी www.nandurbar.nic.in व www.zpndbr.in या संकेतस्थळावर नियमित भेट देऊन भरती प्रक्रियेची अद्यावत स्थिती जाणुन घ्यावी. या संदर्भात कोणताही पत्र व्यवहार करण्यात येणार नाही.

३. उमेदवाराने जाहिराती मधील सुचना व माहितीचे काळजीपूर्वक वाचन करावे.

४. उमेदवारांनी त्यांचे बिनचूक परिपूर्ण भरलेले अर्ज विहीत कार्यालयात विहीत वेळेत सादर करणे आवश्यक आहे. अन्य कार्यालयास सादर केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

५.कंत्राटी पद भरती प्रक्रियेत कोणताही आणि केव्हाही बदल करण्याचा, भरती प्रक्रिया रद्द करण्याचा संपुर्ण अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार यांना राहतील.

६.लेखी परिक्षेसाठीचे ओळखपत्र उमेदवारांनी समक्ष कार्यालयास उपस्थित राहून प्राप्त करणे आवश्यक राहील.

७. उमेदवाराने अर्जावर अलिकडच्य काळात काढलेला पासपोर्ट फोटो विहीत ठिकाणी डकवून तो स्वस्वाक्षांकीत करणे आवश्यक आहे. सदर फोटो सारखाच दुसरा फोटो ओळखपत्र प्राप्त केल्यानंतर त्यांवर डकवावा व साक्षांकन करावे.

८. लेखी परिक्षेस येतांना उमेदवारांने ओळखपत्रा व्यतिरिक्त एक फोटो ओळखपत्राची मुळ व छायांकित प्रत सोबत आणावी. (उदा. आधार कार्ड / मतदान कार्ड / पॅनकार्ड / ड्राईव्हींग लायसन्स इ. ) सदर छायांकित प्रत समवेक्षकाकडे जमा करणे अनिवार्य आहे.

९. उमेदवारांना ओळखपत्र प्राप्त करणे, लेखी परिक्षा, मुलाखतीसाठी येण्या-जाण्याचा कोणताही प्रवास खर्च किंवा इतर कोणताही भत्ता देय राहणार नाही. उमदवारांस स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

१०. उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपात्राच्या आधारे त्यांना लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात येईल. लेखी परिक्षेस प्राप्त गुणानुक्रमानुसार रिक्त पदांच्या विहीत मर्यादेत उमेदवारांना तोंडी परिक्षेसाठी बोलविले जाईल. अशा तोंडी परिक्षेचे वेळी उमेदवारांच्या मुळे कागदपत्रांची देखील तपासणी करण्यात येईल. त्यानंतर लेखी व तोंडी परिक्षेच्या एकुण गुणानुक्रमे उमेदवाराची अंमि निवड करण्यात येईल.

**पत्ता**

**अर्ज करावयाचा पत्ता**

**मा. अध्यक्ष, निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद नंदुरबार**
**दुसरा मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार ४२५४१२**
**दुरध्वनी क्रं. ०२५६४-२१०५७**

**अध्यक्ष**
**निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी** करिता
**जिल्हा परिषद नंदुरबार**

अर्जाचा नमुना

कार्यालयीन नोंदणी क्र.

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नंदुरबार

Pass port Photo

पदाचे नाव :- -------------------------------

संपूर्ण नाव :- ------------------------------------------------------------------------------- लिंग :- स्त्री/पुरुष

पत्र व्यवहाराचा पत्ता :- --------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------

मोबाईल क्र. :- ई-मेल आयडी :-

जन्म तारीख :- उमेदवाराचे दि. २६/०२/२०२० रोजीचे वय :- वर्षे महिने दिवस

अर्जदार माजी सैनिक आहे काय :- होय/नाही

शैक्षणिक अर्हता:-

| अ.क्र. | परिक्षेचे नाव | क्षेत्र (कला/ वाणिज्य/ विज्ञान/ संगणक /स्थापत्य /समाजशास्त्र) | बोर्ड/ विद्यापिठ | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | मिळालेले गुण | टक्के | सोबत झेरॉक्स प्रत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पदव्युत्तर | | | | | | | |
| २ | पदवी | | | | | | | |
| ३ | पदविका | | | | | | | |
| ४ | HSC | | | | | | | |
| ५ | SSC | | | | | | | |

इतर शैक्षणिक अर्हता:-

| अ.क्र. | परिक्षेचे नाव | बोर्ड /विद्यापिठ | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्के | सोबत झेरॉक्स प्रत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | MS-CIT | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

अनुभव

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्था शासन मान्य आहे किंवा नाही (होय/नाही) | कोणत्या पदावर काम केले आहे? | सेवा एकूण वर्ष | अनुभव दाखला जोडला आहे काय? (होय/नाही) |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |

वर नमुद केलेले तपशिल माझे माहितीप्रमाणे पूर्णपणे सत्य आणि बरोबर आहे. या पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता माझे कडे आहे. याची खात्री करुनच मी हा अर्ज सादर करीत आहे. मी असेही प्रमाणित करीतो की, वरील माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी रद्द होणेस अथवा नौकरी गमवण्यास व इतर कार्यवाहीस मी पात्र किंवा बांधिल राहील.

ठिकाण: नंदुरबार
दिनांक: /०२/२०२०

अर्जदाराची सही
( नांव:-